हिन्दुस्तान फीड्स

भरपूर दूध, संपन्न शेतकरी, सशक्त भारत

# गोल्डकॉर्न

हिन्दुस्तान फीड्सची दर्जेदार पशुखाद्ये सर्वच दूध उत्पादक शेतकरी वर्गामध्ये लोकप्रिय असून हिन्दुस्तान फीड्सच्या खाद्याच्या दर्जाबाबत दूध उत्पादक नेहमीच आश्वस्त असतात. काही दूध उत्पादक गोळीपेंडी बरोबर मकाचुनीचा जनावरांच्या आहारात पूरक खाद्य म्हणून वापर करतात. परंतु सध्या ते वापरत असलेल्या बहुतांश मकाचुनीच्या प्रतीबाबत दूध उत्पादक साशंक असल्याने या दूध उत्पादकांच्या सेवेसाठी दर्जेदार व निर्भेळ मकाचुनीचे गोल्डकॉर्न नावाने हिन्दुस्तान फीड्सने उत्पादन केले आहे.

## जनावरांच्या आहारातील गोल्डकॉर्न चे महत्व :

जनावरांच्या आहारातील धान्यामधून ऊर्जा निर्मितीसाठी उपयुक्त पिष्टमय पदार्थ जनावरांना मिळतात या सर्व धान्यामध्ये मका हे धान्य सर्वोत्तम मानले जाते कारण

१) मक्यापासून जनावरांना मोठ्या प्रमाणात पिष्टमय पदार्थ मिळतात व यापासून सर्वाधिक ऊर्जा जनावरांना प्राप्त होते.

२) जनावरांच्या पचनसंस्थेमध्ये मक्याचे पचन करण्याकरता होणारी किण्वन प्रक्रिया (Fermentation) इतर धान्यापेक्षा जास्त वेळ चालते.

३) इतर धान्याच्या तुलनेत मक्यापासून चयापचयाची ऊर्जा अधिक मिळत असल्याने जनावरांचे वजन व दूध वाढण्यास मदत होते.

४) मक्या पासून ऊर्जा मिळत असल्याने जनावरांवर येणारे उष्णतेचे ताण-तणाव कमी होण्यास मदत होते.

**हिन्दुस्तान गोल्डकॉर्न कधी वापरावे?**

1) जनावरे व्याल्यानंतर त्यास अधिक ऊर्जेची गरज असते त्यावेळी गोल्डकॉर्न वापरावे.

2)उन्हाळा व इतर कारणांनी जनावरांवर ताण येऊन त्याची आहारग्रहण क्षमता कमी झाल्यास त्यांना त्वरित ऊर्जा प्राप्तीसाठी गोल्डकॉर्न वापराने चांगला फायदा होतो.




पशुखाद्य निर्मितीमध्ये नं. #1

## उत्कृष्ट मकाचुनी कशी असावी ?

१) मका चुनी मध्ये मक्याचे फोल, चुना, डोलोमाईट पावडर, मीठ, माती इत्यादीची भेसळ नसावी.
२) मकाचुनी करताना वापरलेला मका बुरशी विरहित, कीड न लागलेला परिपक्व असावा.
३) अनेक वेळा मक्यातील प्रमुख घटक काढून घेऊन (ग्लूटेन, ऑइल इ.) उरलेल्या भागाची मका चुनी केली जाते. त्यामुळे त्यातून अपेक्षित सत्वे जनावरांना मिळत नाहीत.

## मका चुनी मधील भेसळ कशी ओळखावी :

१) फोलपटे असलेले पदार्थ मिसळलेल्या मकाचुनीचे वजन कमी भरते. तर चुना, डोलोमाईट पावडर, माती इत्यादी पदार्थ मिसळलेल्या मका चुनीचे वजन जास्त भरते. यासाठी ग्राहकांनी एक लिटर मापाच्या भांड्यामध्ये चांगली मकाचुनी घेऊन त्याचे वजन करून त्या वजनाची तुलना इतर मका चुनीचे त्याच मापाने वजन घेऊन करावी.
२) मका चुनी मध्ये लिंबाचा रस टाकल्यावर त्यातून जर बुडबुडे आले तर त्या मकाचुनी मध्ये चुन्याची भेसळ आहे हे ओळखावे.
३) मका चुनी भांड्यात घेऊन त्यामध्ये पाणी मिसळून हलवून वरचे पाणी २ ते ३ वेळा काढून टाकल्यावर तळाशी मक्याच्या कणाबरोबर वाळू मातीची भेसळ ओळखता येते.
४) भेसळ नसलेल्या मका चुनीचा दर मक्यापेक्षा नेहमी जास्त असतो. कमी दर्जाच्या दूषित मक्यापासून बनविलेल्या चुनीमध्ये बुरशी (fungus) तयार होते. अशा बुरशी पासून विषारी घटक (Aflatoxins) निर्माण होतात. या घटकांची चाचणी प्रयोगशाळेत करता येते.
5) ज्या मका चुनीमध्ये मिठाची भेसळ केलेली असते, त्याची चव खारट असते.

## मकाचुनीतील भेसळीमुळे होणारे परिणाम :

१) माती, वाळूच्या भेसळीमुळे जनावरांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.
२) डोलोमाईटच्या भेसळीमुळे जनावरांच्या पोटातील पचनसंस्थेस (Rumen papillae) हानी पोहचते. जनावरांना हगवण लागते.
३) चुन्याच्या भेसळीमुळे कॅल्शिअमचे प्रमाण वाढून फॉस्फरस व इतर मिनरलच्या शोषणाची क्रिया मंदावते.
४) या सर्वामुळे दूध उत्पादकाचे आर्थिक नुकसान तर होतेच त्याचबरोबर जनावरांच्या आरोग्यावर व दूध उत्पादनावर विपरीत परिणाम होतो.

## हिन्दुस्तान गोल्डकॉर्न वापराचे प्रमाण :

हिन्दुस्तान गोल्डकॉर्न हा गोळी पेंडीला पर्याय नाही. याचा वापर चांगल्या प्रतीच्या गोळीपेंडी बरोबर पूरक आहार म्हणून करावा. हिन्दुस्तान गोल्डकॉर्न वापराचे प्रमाण त्याच्यासोबत वापरत असलेल्या गोळीपेंडीची प्रत, जनावरांच्या शरीराची गरज, जनावराची दुभत्यातील स्थिती, जनावरांना देण्यात येत असलेल्या चाऱ्याची प्रत इत्यादी गोष्टींवर अवलंबून राहते. सर्व सामान्यतः दूध उत्पादकाने प्रति दिन प्रति जनावरास गोळी पेंडी सोबत एक किलो मिसळून द्यावे. गोल्डकॉर्न वापरल्यावर शेण पातळ येऊ लागल्यास त्याचे प्रमाण कमी करावे. दूध उत्पादकाने जास्तीत जास्त दूध मिळेपर्यंत गोल्डकॉर्नचे वापराचे प्रमाण हळू हळू वाढवत न्यावे. परंतु त्याचबरोबर हेही लक्षात ठेवावे कि चांगल्या प्रतीच्या गोळी पेंडीमध्ये मक्याचा वापर केलेला असतो.

**साठवणूक :** गोल्डकॉर्नची साठवणूक थेट सूर्यप्रकाशापासून दूर ओलावा दमटपणा नसलेल्या ठिकाणी करावी.

**उपलब्धता :** आकर्षक लॅमिनेटेड 45 किलोच्या प्लास्टिक बॅग मध्ये उपलब्ध आहे.

हिन्दुस्तान फीड्स

भरपूर दूध, संपन्न शेतकरी, सशक्त भारत

सातारा : ९०११०१२७६२ | बारामती : ०२११२-२४३८३४ | श्रीरामपूर : ९८२२५३३३५७

www.thedifferentexposures.com | 9881713639